# सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सातारा

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्याचे विनियमन व शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण तीन मधील ८ नुसार सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सातारा नागरिकांसाठी सनद प्रसिध्द करीत आहे.

# नागरिकांची सनद २०२६

## नागरिकांची सनद

नागरिकांची सनद म्हणजे सरकारचे लोकांसाठीचे उत्तर दायित्व दर्शविणारा दस्तावेज असतो. जनतेच्या अपेक्षा यावत आहेत. त्या पूर्ण करणेच्या दिशेने सरकाने टाकलेले पाऊल म्हणजे नागरिकांची सनद होय, महाराष्ट्र शासकीय कामात विलंब करण्यास प्रतिबंध करण्याचा अधिनियम, २००१५ मधील कलम ९ मध्ये आता नागरिकांच्या सनदेची तरतूद केली असलेने नागरिकांची सनद प्रसिध्द करणे ही प्रत्येक विभागाची व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांची कायदेशीर जबाबदारी आहे.

**प्रस्तावना**

सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सातारा मधील एक विभाग असून त्यात सर्वसाधारण २० संकलन असून त्यामध्ये प्रामुख्याने आवक जावक, लेखा, सांख्यिकी, अधिकारी फिरती कार्यक्रम व मासिक दैनंदिनी मंजूर करणे, कर्मचारी निवास वाटप, शिक्षकेत्तर कर्मचारी सेवानिवृत्ती व कुटुंब निवृत्ती प्रकरणे मंजुरी देणे, ग्रामविकास विभागाकडील कर्मचारी वेतन व भत्ते यासाठी अनुदान वाटप करणे, जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा संपूर्ण कामकाज, स्वायी समिती सभा कामकाज, समन्वय सभा व इतर सभेची माहिती संकलित करणे, जिल्हा परिषद वर्ग -३ व वर्ग-४ कर्मचा-यांच्या आस्थापना विषयक सर्व कामे करणे, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील सनियंत्रण कार्यालय म्हणून कामकाज करणे. या बाबींचा समावेश आहे.

सामान्य प्रशासन विभागामार्फत पुरविण्यात येणा-या सेवांच्या कार्यपूर्तीचे वेळापत्रक परिशिष्ट १ मध्ये स्तंभ क्रमांक ४ येथे सादर करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण ३ चे कलम ११ मध्ये नमूद केलेल्या एकूण ६ बाबी खालीलप्रमाणे

(एक) न्यायप्रविष्ट बाबी

(दोन) लोक आयुक्त किंवा उप लोक आयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था आयोग, इत्यादी

(तीन) न्यायीक बाबी

(चार) केंद्र व अन्य राज्य शासानांच्या संबंधातील प्रकरणे

(पाच) विधी विधानाशी संबंधातील बाबी

(सहा) मंत्री मंडळातील सादर होणा-या मुख्य धोरणात्मक बाबीसंबधातील प्रकरणे.

वरील एकुण (6 ) सहा बाबी कार्यपुर्तीच्या वेळापत्रकातील परिशिष्ट एक मधील स्तंभ क्रमांक 4 येथील सुट राहिल.

5(अ) गाऱ्हाणी/ तक्रारी यांचे निराकरण

कार्यपूर्तीस होणार विलंब वा अन्य काही पाहाणी असलेल्या संबंधी परिशिष्ट मधील स्तंभ क्रमांक ५ मध्ये नमूद केलेल्या अधिका-याकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राज झाल्यापासून ७ दिवसांत त्याची पहुँच करण्याची नवाबदारी संबंधित अधिका-याची राहील यानंतरही नागरिकांचे समाधान न झाल्यास संबंधित मा मुख्य कार्यकारी अधिकारी अतिरिका मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सातारा याबाबत त्यांचा तक्रार करता येईल गा-हाणी समक्ष पेटीने पाद्वारे मांडता येतील

५. (ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा सिंहावलोकन

या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबत तथा परिणाम कारकतेचा आहावा पशुसंवर्धन विभागाकडून दरवर्षी घेण्यात येईल व त्यात आवश्यकतेनुसार बदल करण्यात येतील.

५. (क) जनसामान्यांकडून सुचना

ही नागरिकांची सनद सर्व सामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असले व सन्माननीय नागरिकांच्या बहुमूल्य सुचनांचा गांभीर्य पूर्वक विचार करून त्यात वेळोवेळी सुधारणा घडवून आणता येतील. सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद साताराअधिनस्त येणा-या सेवा उपभोगणा-या नागरिकांना आपले हक्क मांडण्यासाठी सनद नेहमीच सहकार्य करेल.

६. नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी

सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद सातारा नागरिकांच्या या सनदेची अंमलबजावणी करण्यास कटीबध्द आहे. व आपल्या अधिपत्याखालील सेवया कर्तव्ये भावनेने व कार्य तत्परतेने उपलब्ध करून देण्याची हमी देत आहे. या सेवा पुरवितांना नागरिकांना सौनान्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी विभागातील प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांची राहील.

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांचे बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडण्यास होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील प्रकरण ३ च्या कलम १० (१) मधील तरतुदीस अनुसरून प्रत्येक शासकीय कर्मचारी त्यास नेमून दिलेल्या किंवा त्याच्याशी संबंधित शासकीय कर्तव्य व शासकीय काम अंत्यत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीघ्रतीने पार पाडणेस बांधील असेल.

सर्वसाधारणपणे, कोणतीही फाईल विभागातील किया कार्यालयातील कोणत्याही शासकीय कर्मचा-याकडे कामाच्या सात दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही. परंतु तात्काळ आणि तातडीच्या फाईली,

त्या प्रकरणाच्या शक्य निकडोच्या शक्य तितक्या शिव्रतेने आणि प्राधान्याने तात्काळ फाईल शक्यतो एका दिवसांत किंवा दुसत्या दिवशी सकाळी आणि तातडीच्या स्वरूपाची

फाईल शक्यतो चार दिवसांत निकाली काढणेत येईल. परंतु दुस-या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवयाची आवश्यकता नसलेल्या फाईलौच्या संबंधात संबंधित विभाग त्या प्रकरणावर पंचेचाळीस दिवसात आत निर्णय घेईल आणि आवश्यक ती कार्यवाही करील आणि दुस-या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवपाची आवश्यकता असलेल्या फाईलौंच्या संबंधात तीन दिवसाच्या आत निर्णय घेणेत येईल आणि आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)**
**सातारा जिल्हा परिषद सातारा**

जा.क्र.साप्रवि/आस्था2(3)/16/2026
सातारा जिल्हा परिषद सातारा
दि.02.01.2026

# ग्रामस्थांची सनद

## परिशिष्ट 2

**पंचायत राज संस्थांची योजना विषयक जबाबदारी**

पंचायत राज व्यवस्थेतील जिल्हा परिषदा पंचायत समिती यामध्ये साधारणतः योजना अंमलबजावणीसाठी ग्राम व ग्रामपंचायत यांच्या सौ उत्पन्नाच्या योजना राज्य तालुका उपविभाग व जिल्हा स्तरावर कोणाची जबाबदारी शासनाने हस्तांतरित केलेल्या योजना अभिसरण तत्त्वावर आहे हे निश्चित केलेले आहे राबविण्यात येणाऱ्या योजना व केंद्रशासन पुरस्कृत योजनांचा समावेश या प्रकरणात केलेला आहे.

| **अ.क्र.** | **योजनेचे नाव** | **योजना अंमलबजावणीची जबाबदारी** | | |
|---|---|---|---|---|
| | | **ग्रामस्तर** | **तालुका/उपविभाग स्तर** | **जिल्हा स्तर** |
| 1 | महात्मा गंधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGS) | ग्रामसेवक | गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) |
| 2 | बायोगॅस ससयंत्र | ग्रामसेवक | कृषी अधिकारी/गट विकास अधिकारी | कृषी विकास अधिकारी |
| 3 | विशेष घटक योजना अंतर्गत विहिरी व अवजारे | ग्रामसेवक | कृषी अधिकारी/गट विकास अधिकारी | कृषी विकास अधिकारी |
| 4 | खते बी बियाणे परवाना | -- | कृषी अधिकारी | कृषी विकास अधिकारी |
| 5 | विविध मोहिमा अंतर्गत बियाणे,किटक नाशके अवजारे इत्यादी | ग्रामसेवक | कृषी अधिकारी/गट विकास अधिकारी | कृषी विकास अधिकारी |
| 6 | जिल्हा परिषद/शासकीय अनुदारनातुन कृषि विकासाच्या इतर योजना | ग्रामसेवक | कृषी अधिकारी/गट विकास अधिकारी | कृषी विकास अधिकारी |
| 7 | स्वर्णजयंती ग्राम स्वंयरोजगार योजना (SGSY) | ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | प्रकल्प संचालक/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |
| 8 | राजीव गांधी ग्रामीण निवारा योजना | ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | प्रकल्प संचालक |
| 9 | इंदिरा आवास योजना (IAY) व रमाई आवास योजना | ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | प्रकल्प संचालक |
| 10 | यशवंत ग्राम समृध्दी योजना | ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी | गट विकास अधिकारी/ उप अभियंता | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)/कार्याकरी अभियंता |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| 11 | जिल्हा ग्राम विकास निधी अंतर्गत कामे | ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी | गट विकास अधिकारी/ उप अभियंता | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)/कार्याकरी अभियंता |
| 12 | पायाभूत सुविधा कामे (स्वर्णजयंती ग्राम स्वंयरोजगार योजना) | ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी | गट विकास अधिकारी/ उप अभियंता | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)/ कार्याकरी अभियंता |
| 13 | पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम/हरियाल | सरपंच/ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी/स्वयंसेवी संस्था/यंत्रणा | गट विकास अधिकारी/स्वयंसेवी संस्था/यंत्रणा | प्रकल्प संचालक/ स्वयंसेवी संस्था/यंत्रणा |
| 14 | संपुर्ण स्वच्छता कार्यक्रम/ निर्मल भारत अभियान | सरपंच/ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी | गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)/ संपुर्ण स्वच्छता अभियान कक्ष |
| 15 | ग्रामपंचायत सुधार योजना | सरपंच/ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी | गट विकास अधिकारी/ उप अभियंता | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)/ कार्याकरी अभियंता |
| 16 | दलित वस्ती सुधार योजना | सरपंच/ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी/कनिष्ठ अभियंता | गट विकास अधिकारी/ उप अभियंता | समाज कल्याण अधिकारी / कार्याकरी अभियंता |
| 17 | समाज कल्याण विभागाच्या वैयक्तिक लाभाच्या विविध योजना | सरपंच/ग्रामसेवक /ग्रामविकास अधिकारी | गट विकास अधिकारी/ कक्षअधिकारी पंचायत समिती | समाज कल्याण अधिकारी |
| 18 | तेराव्या वित्त आयोगांतर्गत कामे | सरपंच/ग्रामसेवक/ तांत्रिक कर्मचारी | गट विकास अधिकारी/इतर अधिकारी | संबंधित खाते प्रमुख/ लेखा वित्त अधिकारी |
| 19 | मागासवर्गीय विध्यार्थांना शिष्यवृत्ती | प्राथमिक शिक्षक | गट शिक्षण अधिकारी /गट विकास अधिकारी | समाज कल्याण अधिकारी/शिक्षण अधिकारी |
| 20 | एकात्मिक बाल विकास सेवा योजना | अंगणवाडी कार्यकर्तो/पर्यवेक्षिका | बालविकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) |
| 21 | महिला व बाल कल्याण विभागाच्या विविध योजना | अंगणवाडी कार्यकर्तो/ग्रामसेवक | बालविकास अधिकारी/गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) |
| 22 | स्वयंसहाय्यता बचत गटांची स्थापना व सबलीकरण | अंगणवाडी कार्यकर्तो/ग्रामसेवक | बालविकास अधिकारी/गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) |
| 23 | महिला समुपदेशन केंद्र | अंगणवाडी कार्यकर्तो/ग्रामसेवक | बालविकास अधिकारी/गट विकास | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अधिकारी | |
| 24 | अंगणवाडी लाभार्थींची वैद्यकीय तपासणी | अंगणवाडी कार्यकर्तो/वैद्यकीय अधिकारी | बालविकास अधिकारी/तालुका आरोग्य अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी /उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) |
| 25 | शालेय पोषण आहार | मुख्याध्यापक/ ग्राम शिक्षण समिती | गट शिक्षण अधिकारी/ तहसिलदार | शिक्षणाधिकारी (प्राथ)/ जिल्हा पुरवठा अधिकारी |
| 26 | गणवेश वाटप | मुख्याध्यापक/ ग्राम शिक्षण समिती | गट शिक्षण अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ) |
| 27 | सर्व शिक्षण अभियानातंर्गत बाधकामेत्तर कार्यक्रम | मुख्याध्यापक/ ग्राम शिक्षण समिती | गट शिक्षण अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ) |
| 28 | सावित्रीबाई फुले दत्तक योजना | मुख्याध्यापक/ ग्राम शिक्षण समिती | गट शिक्षण अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ) |
| 29 | वस्ती शाळा/ महात्मा फुले शिक्षण हमी केंद्रे | मुख्याध्यापक/ ग्राम शिक्षण समिती | गट शिक्षण अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ) |
| 30 | मुलींना उपस्थिती भत्ता | मुख्याध्यापक/ ग्राम शिक्षण समिती | गट शिक्षण अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ) |
| 31 | गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती | मुख्याध्यापक/ ग्राम शिक्षण समिती | गट शिक्षण अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ) |
| 32 | शिक्षण विभागाच्या शासकीय /जिल्हा परिषद निधीतील इतर योजना | मुख्याध्यापक/ ग्राम शिक्षण समिती | गट शिक्षण अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ) |
| 33 | सर्व शिक्षा अभियानांतर्गत बांधकामे | मुख्याध्यापक/ग्राम शिक्षण समिती/कनिष्ठ अभियंता | गट शिक्षण अधिकारी/उपअभियंता | शिक्षणाधिकारी (प्राथ)/ कार्यकारी अभियंता |
| 34 | शाळा खोल्या बांधकामे/दुरुस्ती | मुख्याध्यापक/ग्राम शिक्षण समिती/कनिष्ठ अभियंता | गट शिक्षण अधिकारी/उपअभियंता | शिक्षणाधिकारी (प्राथ)/ कार्यकारी अभियंता |
| 35 | अंपग विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव | मुख्याध्यापक/ग्राम शिक्षण समिती/आरोग्य पर्यवेक्षक | गट शिक्षण अधिकारी/ तालुका आरोग्य अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ)/ जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 36 | शाळेतील विद्यार्थ्यांची वैद्यकिय तपासणी | मुख्याध्यापक/ग्राम शिक्षण समिती/आरोग्य पर्यवेक्षक | गट शिक्षण अधिकारी/ तालुका आरोग्य अधिकारी | शिक्षणाधिकारी (प्राथ)/ जिल्हा आरोग्य अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 37 | लसीकरण (ANM) | आरोग्य पर्यवेक्षक | तालुका आरोग्य अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 38 | रोग निदान शिबीरे | वैद्यकिय अधिकारी | तालुका आरोग्य अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 39 | कुंटुब कल्याण कार्यक्रम | आरोग्य कर्मचारी/ वैद्यकिय अधिकारी | गट विकास अधिकारी/तालुका आरोग्य अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 40 | प्राथमिक आरोग्य केंद्र/उप केंद्र बांधकामे | कनिष्ठ अभियंता/ वैद्यकिय अधिकारी | उपअभियंता/ तालुका आरोग्य अधिकारी | कार्यकारी अभियंता / जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 41 | जननी सुरक्षा योजना | वैद्यकिय अधिकारी / ग्राम आरोग्य पोषण समिती | तालुका आरोग्य अधिकारी/ गट विकास अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 42 | पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणे | ग्रामसेवक / आरोग्य सेवक | तालुका आरोग्य अधिकारी/ गट विकास अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 43 | इतर राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम अंधत्व / कुष्ठरोग निर्मुलन / क्षयरोग/हिवताप/हत्ती रोग निर्मुलन | आरोग्य पर्यवेक्षक/ वैदयकिय अधिकारी | तालुका आरोग्य अधिकारी | जिल्हा आरोग्य अधिकारी |
| 44 | प्रधानमंत्री ग्राम सडक योजना | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| 45 | सर्व योजनांतर्गत रस्त्यांची व पुलांची कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| 46 | वैधानिक विकास कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| 47 | स्थानिक विकास निधी कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| 48 | खासदार विकास निधी अंतर्गत कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| 49 | रस्त्यांची विशेष दुरुस्ती किरकोळ कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| 50 | पुर हनी कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| 51 | डोंगरी विकास निधी कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |
| 52 | महात्मा गांधी रोजगार हमी योजनांतर्गत कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(बांधकाम) | कार्यकारी अभियंता (बांधकाम) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 53 | लघुसिंचन पाझर तलाव कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(लघु पाटबांधारे) | जिल्हा जलसंधारण अधिकारी |
| 54 | कोल्हापुर पध्दतीचे बंधारे कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(लघु पाटबांधारे) | जिल्हा जलसंधारण अधिकारी |
| 55 | लघुपाटबंधारे दुरुस्ती कामे | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता(लघु पाटबांधारे) | जिल्हा जलसंधारण अधिकारी |
| 56 | स्थानिक विकास निधी अंतर्गत पाणी पुरवठा योजना | कनिष्ठ अभियंता | उपअभियंता | कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) |
| 57 | रोजगार हमी योजनेतंर्गत जवाहर विहिरी | कनिष्ठ अभियंता/ ग्रामसेवक | उपअभियंता (लघुपाटबंधारे)/ गट विकास अधिकारी | जिल्हा जलसंधारण अधिकारी |
| 58 | तीर्थक्षेत्र विकास निधी कामे | कनिष्ठ अभियंता/ ग्रामसेवक | उपअभियंता/ गट विकास अधिकारी | कार्यकारी अभियंता (बांधकाम)/ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) |
| 59 | ग्रामीण पाणी पुरवठा योजनातंर्गत कामे | कनिष्ठ अभियंता/ ग्रामसेवक | उपअभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) | कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) |
| 60 | जलस्वराज्य बाह्य अर्थसाहाय्य योजनांतर्गत कामे | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | उपअभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)/गट विकास अधिकारी | कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)/ डीएफटी |
| 61 | शिवकालीन पाणी साठवण योजना | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | उपअभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)/गट विकास अधिकारी | कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)/ वरिष्ठ भु वैज्ञानिक |
| 62 | विंधन विहिरी कार्यक्रम | ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | उपअभियंता | कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा)/ भु वैज्ञानिक,भु जल सर्वेक्षण विकास यंत्रणा |
| 63 | नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती | ग्रामसेवक /ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती | उपअभियंता | कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणी पुरवठा) |
| 64 | जनावरांचे लसीकरण व औषधोपचार | पशुधन पर्यवेक्षक / पशुधन विकास अधिकारी | पशुधन विकास अधिकारी (विस्तार) | जिल्हा पशुसंर्धन अधिकारी |
| 65 | जनांवरांची रोग निदान शिबीरे | पशुधन पर्यवेक्षक / पशुधन विकास अधिकारी | पशुधन विकास अधिकारी (विस्तार) | जिल्हा पशुसंर्धन अधिकारी |
| 66 | कृत्रिम रेतन कार्यक्रम | पशुधन पर्यवेक्षक / पशुधन विकास अधिकारी | पशुधन विकास अधिकारी (विस्तार) | जिल्हा पशुसंर्धन अधिकारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 67 | जिल्हा परिषद/ शासकिय अनुदानातुन पशुसंवर्धन विकासाच्या इतर योजना | पशुधन पर्यवेक्षक / पशुधन विकास अधिकारी | पशुधन विकास अधिकारी (विस्तार) | जिल्हा पशुसंर्धन अधिकारी |

**टीप** :- योजनांच्या अंमलबजावणीची जबाबदारी बाबत तसेच वरील योजनांची यादी ही केवळ मार्गदर्शक आहे संबंधित कर्मचारी/अधिकारी यांच्यामध्ये या व्यतिरिक्तही योजनांचा त्यामध्ये समावेश असू शकेल स्थानिक परिस्थितीनुसार बदल असू शकेल.

स्वाक्षरीत /-

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सातारा जिल्हा परिषद सातारा**